एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील अंगणवाड्यांकरीता "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर" पुरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.६५/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

वाचा :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. एबाविसेयो/का-२/३३७/२०१५, दिनांक १३.०२.२०१५

२) महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे पत्र क्र.SPC/RCT/Water Filter Cum Purifier/०३/२०१४-१५C-८८३, दिनांक ०७.०२.२०१५

प्रस्तावना :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील ८ पैसे तरतूदीमधून नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांना "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर" पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांना २५ लिटर पाणी साठवणूक क्षमता असलेले (प्रति नग रु.५२२०/-दराप्रमाणे) "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर" प्रति केंद्र १ नग प्रमाणे महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे पत्र क्र. SPC/RCT/Water Filter Cum Purifier/०३/२०१४-१५C-८८३, दिनांक ०७.०२.२०१५ मध्ये नमूद केल्यानुसार Portable Water Purification Device with ultra Violet Technology. २५ Liter Storage Type Machine Confirming to IS १४७२४/१९९९ or with I.S.I. mark २५ लिटर पाणी साठवणूक क्षमता असलेले "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर" रु.५२२०/- दरनिश्चितीनुसार व त्यातील विनिर्देशानुसार (Specification नुसार) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांनी मे.एव्हरेस्ट इंडस्ट्रीज, मेन रोड जवळ, गणपती गल्ली, गंगापूर, जि.औरंगाबाद ४३११०९ यांच्याशी करण्यात आलेल्या दरनिश्चितीनुसार खरेदी करण्यासाठी लागणारा रु.२,६३,४५,४८१/- (रुपये दोन कोटी त्रेसष्ट लाख पंचेचाळीस हजार चारशे एक्याऐंशी फक्त) एवढा निधी सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दरकरारातील दर व विनिर्देश (Specification) च्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१) "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर" खरेदी करतांना दरकरारपत्रकातील अटी व शर्तीचे पालन तंतोतंत करावे. तसेच दरकरारपत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे (Specefication प्रमाणे) पुरवठा केला जाईल याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी घ्यावी.

२) "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर" हे [तपशिल : Portable Water Purification Device with ultra Violet Technology. २५ Liter Storage Type Machine Confirming to IS १४७२४/१९९९ or with I.S.I. mark Brand "yogvally Pure" २५ लिटर पाणी साठवणूक क्षमता रु.५२२०/-] या स्वरुपात राहील.

३) सदरचा निधी शासनाच्या विहित धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

४) पुरवठादाराने वरीलप्रमाणे वरील वस्तुंचा पुरवठा प्रकल्पस्तरा पर्यंत करावा. प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्याच दिवशी पंचनामा करुन स्विकारावे व दुस-या दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना कळवावे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात शासन पत्र क्र.विपताप्र-२०११/प्र.क्र.५३३/का.६,दि.१७.०७.२०१२ मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

५) वरील वस्तूंचा पुरवठा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावा. पुरवठादाराने मागणीप्रमाणे विहित प्रमाणात, विहित केलेल्या गुणवत्तेनुसार वरील वस्तूंचा प्रकल्प स्तरापर्यंत पुरवठा केला आहे. याबाबतची खात्री करण्यात यावी. तसेच सदर पुरवठा केलेल्या बाबीवर आयसीडीएसच्या वापरासाठी / शासनामार्फत पुरवठा असा शिक्का मारलेला किंवा लेबल लावलेला असावा. वरील वस्तूंचे वाटप / पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

६) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, याद्दष्टीने स्वयंस्पष्ट माहिती अंगणवाडीतील नोंदवहीमध्ये उत्पादनाचा दिनांक / एकूण पुरवठा / एकूण उपयोग याबाबतची योग्य नोंद ठेवणे, इत्यादी बाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी द्याव्यात.

७) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

८) आपली अंगणवाडी हया मासिकात सदर पुरवठयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ८ पैसे या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

नागरी प्रकल्पांसाठी :-

योजनेत्तर :- लेखाशिर्ष - मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, नागरी (०१) पोषण आहार कार्यक्रम (०१) (०१) पोषण आहार कार्यक्रम, (२२३६ ०१८१), ११ आहार खर्च

योजनांतर्गत :- लेखाशिर्ष - मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६ ०५४६), १९ आहार खर्च या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्र.अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दिनांक ०९.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मे.एव्हरेस्ट इंडस्ट्रीज, मेन रोड जवळ, गणपती गल्ली, गंगापूर, जि.औरंगाबाद ४३११०९
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)

निर्गमित
दिनांक: २३/०५/२०१५

G.R.२०१५